# ८. वाट पाहताना

– अरुण ढेरे

लेखिकेने 'वाट पाहणे' या गोष्टीचे अनेक पैलू या पाठात दाखविले आहे. ज्याची जशी वाट पाहिली जाते, तसे हे वाट पाहणे कधी हुरहूर लावणारे, तर कधी उत्कंठा वाढविणारे, कधी सुखद तर कधी दु:खद ही असू शकते.

सुट्टीचे वाट पाहणे, दूर गेलेली व्यक्ती खूप दिवसांनी येणार आहे तिच्या येण्याची वाट पाहणे, पत्राची वाट पाहणे असे नानाविविध वाट पाहण्याचे प्रकार असतात. या वाट पाहण्यात विविध भावनांचा परिपोष झालेला असतो.

लेखिका अरुणा ढेरे यांनी छोटासा मुद्दा विविध प्रकारांनी सजविला आहे. वाट पाहण्याचे महत्त्व, फायदे त्यांनी सांगितले आहेत.